१ आर.सी.सी.क्र.८३३/२०१०
शासन वि. मुस्तफा व इतर
नि.क्र.५१

अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्रं.१ चा शपथेवर जबाब

माझे नांव — सिताराम मोतीराम शिंगणे,

माझे वय – ७१ वर्ष , धंदा : सेवानिवृत्त

राहणार – किनगावराजा, ता. सिंदखेडराजा, जि. बुलढाणा.

**सरतपास सहाय्यक सरकारी वकील श्रीमती जे. डी. राठोड यांच्यामार्फत सूरू**

०१. सन २०१० मध्ये मी सदर बाजार पोलीस ठाणे येथे ए.एस.आय म्हणुन कार्यरत होतो. मी व पोलीस हेड कॉन्स्टेबल वनारसे पोलीस ठाणे येथे हजर असतांना फोन आला की, बुंदेले चौक येथे चंदन चोर आले आहेत. त्याप्रमाणे मी व श्री.वनारसे तेथे गेलो असता दोन इसम मिळुन आले त्यांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडे चंदनाचे लाकुड मिळुन आले. त्यांच्याकडे चंदनाच्या लाकडाबाबत विचारपुस केली असता त्यांनी माहिती दिली नाही. त्यानंतर मी फिर्याद दाखल केली. आता मला फिर्याद दाखविली असता त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.५२** देण्यात येते. आरोपींना दाखविल्यास ओळखु शकेल.

**सरतपास पुर्ण.**

**उलटतपास आरोपीतर्फे विधिज्ञ श्री. सय्यद तारीक यांच्यामार्फत सुरु–**

०२. चंदनाचे लाकुड ओळखण्यासाठी मी काही कोर्स केलेला नाही. सदर दिवशी माझी रात्रपाळीची डयुटी होती त्याबाबतचा कागद मी फिर्याद दाखल करतांना दिला नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीकडुन चंदनाचे लाकुड मिळुन आले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी सांगतो त्याप्रमाणे घटना घडली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी फिर्याद दाखल केली व आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

स्वाक्षरीत/–

(सि. म. पाडोळीकर)

दि. ०८.०४.२०२६. मुख्य न्यायदंडाधिकारी, जालना.